# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३६०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२८/०६/२०१६.

**१) भांडण, शिवीगाळ व मारहान करून धमकी दिली. :—**

दिनांक २६/०२/०१६ चे १७.३० वा. दरम्यान आरोपी क्र. २ व ३ यांची लहान मुलगी गुडीया वय ०२ वर्ष हिने खेळताखेळता भांडे धुण्याची साबण पाण्यात टाकली, तेव्हा फिर्यादी सौ. कवीता राजु वाढई वय ३५ वर्ष रा. बेरोडी हिने तिला सहाजीकच ''तुझे आईवडील माझ्या मुलांना खाटेवर बसु देत नाही व शिव्या देतात, तु साबण पाण्यात का घातली.'' असे बोलल्यावरून तिन्ही आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी सोबत भांडण करून तिला वाईट शिव्या देवुन घरासह पेटवुन देण्याची धमकी दिली व आरोपी क्र. १ ने काठीने, हाताबुक्कीने फिर्यादिच्या कमरेवर, मांडीवर, चेह—यावर व डोक्यावर मारून जखमी केले. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) अज्ञात ट्रकच्या धडकेत इसम जखमी. :—**

दिनांक २७/०२/०१६ रोजी १६.०० वा. दरम्यान विरेन्द्र डिगांबर ढोमणे वय ३० वर्ष, रा. पाढंराबोडी हे त्यांच्या मोटार सायकल क्र. एमएच ३५ एच ६०२७ ने भंडारा वरून पाढंराबोडी कडे येत असतांना घाटनाल्याजवळ अज्ञात आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक हयगयीने, भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन फिर्यादीच्या मोटार सायकलला पांढराबोडी घाट नाला येथे धडक मारून किरकोळ जखमी करण्यास कारणीभुत झाला. असे फिर्यादी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३७ भादंवी सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रायपुरकर पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :—**

दिनांक २७/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. मोहाडी, कारधा, गोबरवाही, पालांदुर, पवनी व लाखांदुर येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी दारू + ८० किलो सडवा मोहा कि. ४५००/—रू. व ११ लिटर ७०० मिली. देशी दारू कि. ३७३०/—रू. तसेच जुगारातुन कि. २०८८/—रू. असा एकुण कि. १०,३१८/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२० O/C

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.